N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** उंब्रज **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0084 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/03/2019 01:57 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार **Date From (दिनांक पासून):** 16/03/2019

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 16/03/2019

**Time From (वेळेपासून):** 15:10 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/03/2019 **Time (वेळ):** 01:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद** 009 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/03/2019 01:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 20 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तारळे येथिल, कडवे तलाठी कार्यालयात ,ता पाटण

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** बाळुताई पतंगराव पतंग डफळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1967 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राहुडे तापाटण,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राहुडे तापाटण,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कृष्णात तुकाराम वाघमारे | | | 1. देसाई गल्ली शिवलिंग मंदीराजवळ,पाटण ,उंब्रज,सातारा,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

खबरी जबाब दिनांक 16/03/2019मी, बाळुताई पतंगराव (पतंग) डफळे, वय 52 वर्षे, व्यवसाय - शेती, रा.राहुडे ता.पाटण जि. सातारासमक्ष हजर होवून देते खबरी जबाब की, मी दिनांक 15/03/2019 रोजी श्री. अशोक शिर्के, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा यांना संपर्क साधुन माझे आईच्या नावे दस्त नोंदीच्या अर्जावर घेतलेल्या हरकतीचा निकाल आमच्या बाजुने देण्यासाठी व तशी नोंद कायम करण्यासाठी तारळे, सर्कल श्री. वाघमारे साहेब हे पैसे मागत असल्याबाबत कळविले. त्यावेळी शिर्के साहेब यांनी मला दिनांक 16/03/2019 रोजी 10.00 वा. तारळे गावचे अलीकडे येवुन थांबण्याची सुचना दिली. त्याप्रमाणे मी व माझी आई पार्वती गुजाबा मोरे हिचेसह दिनांक 16/03/2019 रोजी सकाळी 10.00 वाजता तारळे गावचे अलिकडे येवुन थांबुन राहिले. त्यानंतर पोलीस उप अधिक्षक, श्री. शिर्के साहेब, त्याचे सापळा पथकासह खाजगी वाहनामध्ये मी थांबले ठिकाणी 10.00 वाजता आले. त्याठिकाणी श्री. शिर्के साहेबांनी, माझी व जिल्हा क्रिडा कार्यालयातील 1) महेश मधुकर खुटाळे, राज्य क्रिडा मार्गदर्शक व 2) रविभुषण आप्पासाहेब कुमठेकर, राज्य क्रिडा मार्गदर्शक या दोन पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार शिर्के साहेबांना सांगितली ती खालीलप्रमाणे, वरील ठिकाणी माझी आई श्रीमती पार्वती गुजाबा मोरे हिच्यासोबत राहण्यास असुन माझी आई वयस्कर आहे. माझे शिक्षण झाले नसल्याने मला लिहता, वाचता येत नाही. राहुडे ता. पाटण जि. सातारा येथे आमची वडीलोपार्जित शेतजमीन व घर आहे. आमची हालाखीची परिस्थीती असल्यामुळे मी व माझ्या आईने आमची वडीलोपार्जित शेतजमीनी पैकी राहुडे जमीन गट नं. 108 व 120 मधील पाच आणे हिस्सा आमचे गावातील सुषमा दिलीप मोरे यांना सन 2006 मध्ये 10 वर्षासाठी मुदत खरेदी दस्ताने एक लाख रूपयांस कसण्यासाठी दिली होती. कसण्यासाठी दिलेल्या जमीनचे मुदत खरेदी खताचा 10 वर्षाचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर आम्ही सुषमा दिलीप मोरे यांना त्यांची एक लाख रूपये रक्कम परत देवुन जमीन परत मिळणेसंदर्भात दुय्यम निबंधक पाटण येथे दस्त क्रमांक 1705/2015 प्रमाणे दस्त करून ती जमीन पुन्हा ताब्यात घेतली आहे. दस्त क्रमांक 1705/2015 ची नोंद घेवुन तसा 7/12 उतारा मिळण्यासाठी मी माझ्या आईच्या नावाने माहे ऑगस्ट 2017 मध्ये तलाठी, तारळे ता. पाटण यांना दस्तासह अर्ज दिला होता. त्यावर मी तलाठी तारळे यांची त्यांच्या कार्यालयात जावुन माझ्या नोंदीच्या कामाबाबत विचारणा केली असता त्यांनी मी फेरफार नंबर 832 प्रमाणे नोंद घेतली आहे असे सांगुन त्यांनी त्या फेरफारची प्रत मला दिली व तुमची नोंद आता तारळे सर्कल कायम करतील असे सांगितले. त्यामुळे मी तारळे सर्कल कार्यालयात दोन तिन वेळा गेले परंतु त्या ठिकाणी माझी सर्कल यांची भेट झाली नाही. त्यावेळी मला सुषमा दिलीप मोरे यांनी आमच्या अर्जावर हरकत घेतली असल्याचे व त्यामध्ये आम्हाला आज रोजी बोलाविले असल्याचे मला समजले. त्यानंतर माझ्या ओळखीचे श्री. सुहास माने यांनी मला तारळेचे सर्कल वाघमारे यांनी तुम्हाला तुमच्या कामासंदर्भात पैसे घेवुन भेटायला बोलाविले आहे, तुम्ही पैसे दिले तरच तुमच्या बाजुने निकाल होईल व तुमच्या नोंदीचे काम होईल असे सांगितले. तरी मी आज रोजी श्री. सुहास माने यांनी सांगितल्याप्रमाणे तारळे ता. पाटणचे सर्कल श्री. वाघमारे यांची तारळे सर्कल कार्यालयात

सकाळी जावुन त्यांची भेट घेवुन माझ्या दस्त नोंदीच्या अर्जावर घेतलेल्या हरकतीबाबत व नोंदीबाबत चर्चा करून ते मागणी करतील ती रक्कम त्यांना देणार आहे. सर्कल वाघमारे व माझ्यामध्ये कोणतेही आर्थिक व्यवहार नसुन पुर्व वैमनस्य नाही तरी त्यांच्यावर योग्यती कायदेशीर कारवाई करावी ही विनंती. वगैरे तक्रार मी सांगितली ती शिर्के साहेबांनी लिहुन घेवून मला वाचून दाखविली. त्या तक्रारी जबाबावर मी माझा निशाणी अंगठा उठविला. माझ्या तक्रारी जबाबाचे दोन्ही पचांनी वाचण करुन त्यावर शिर्के साहेब व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर माझ्या तक्रारीप्रमाणे माझ्याकडे लाच मागणी झाली अगर कसे याची पडताळणी करण्याचे ठरवुन त्याकामी पंच नं. 1 म्हणुन कुमठेकर व पंच नं. 2 म्हणुन खुटाळे यांनी काम करण्याचे शिर्के साहेबांनी ठरविले. त्यानंतर मला व पंच नं. 1 यांना शिर्के साहेबांनी सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह वाघमारे सर्कल यांची भेट घेण्यासाठी खाजगी वाहनाने तारळे सर्कल कार्यालयाचे अलीकडे उतरुन पायी चालत पाठविले. मी व पंच नं 1 असे तारळे सर्कल कार्यालयात जावून वाघमारे सर्कल यांची भेट घेवुन माझ्या आईचे नावे असलेल्या जमिन दस्ताचे नोंदीसाठी दिलेल्या अर्जाबाबत तसेच त्यावर घेतलेल्या हरकतिबाबत चर्चा झाली. त्यावेळी सर्कल वाघमारे यांनी माझ्याकडे आईच्या अर्जाप्रमाणे दस्ताची नोंद घेण्याचे कामाबाबत थोडक्यात चर्चा करून पैशाची संदिग्ध चर्चा केल्याने शिर्के साहेबांनी पुन्हा आम्हाला पडताळणीकामी सुचना देवुन व्हाईस रेकर्डरसह वाघमारे सर्कल यांची भेट घेण्यासाठी पायी चालत पाठविले. मी, पंच नं 1 यांचे समवेत तारळे येथील कडवे गावचे तलाठी कार्यालयात जावून वाघमारे सर्कल यांची समक्ष भेट घेवुन माझ्या कामाबाबत चर्चा केली असता माझ्या आईचे नावे असलेल्या जमिन दस्ताचे नोंदीचे तक्रारी अर्जाचा निकाल आमचे बाजुने लावुन नोंद कायम करण्याचे कामाबाबत चर्चा होवुन सर्कल वाघमारे यांनी माझ्याकडे 2000/- रुपयांची लाच मागणी करुन ती लागलीच स्विकारण्याची तयारी दर्शविली त्याची रेकर्डमध्ये झालेल्या संभाषणावरुन व माझ्या तसेच पंच नं. 1 यांचे हकिकतीवरुन शिर्के साहेबांची व दोन्ही पंचांची खात्री झाली.त्यानंतर शिर्के साहेब यांचे सुचनेनुसार मी 2000/- रुपये लाच रक्कम हजर केली. त्या नोटांचे क्रमांक शिर्के साहेब यांनी एका को-या कागदावर लिहुन ठेवुन त्या लाच रकमेस अंथ्रासिन पावडर लावणे बाबतची कारवाई खाजगी वाहनातच केली. सापळा कारवाईसंबंधाने शिर्के साहेब यांनी मला व दोन्ही पंचांना तसेच सापळा पथकास आवश्यक त्या सर्व सुचना दिल्या. त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर देवुन मला व पंच नं.1 यांना खाजगी वाहनातुन उतरुन पायी चालत सर्कल वाघमारे यांची भेट घेण्याकामी तारळे गावचे जवळून कडवे तलाठी कार्यालय येथे रवाना केले. मी व पंच नं 1 असे पायी चालत तारळे येथील कडवे तलाठी कार्यालयात सर्कल वाघमारे याची भेट घेण्यास गेलो. आमचे पाठोपाठ शिर्के साहेब, पंच नंबर 2 व सापळा पथक वाहनातून उतरुन काही अंतर ठेवुन पायी चालत चालत आले. मी व पंच नं 1 असे तारळे येथील कडवे गावचे तलाठी कार्यालयात गेलेवर वाघमारे सर्कल त्या ठिकाणी नव्हते त्यावेळी मी तेथे त्यांची विचारणा केली इतक्यात वाघमारे सर्कल हे त्या ठिकाणी आले त्यावेळी त्यांची व माझी भेट झाली. त्यावेळी आमचेत कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा वाघमारे सर्कल यांनी माझ्याकडे पाहुन त्यांच्या उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासुन लाच मागणीचा सुचक इशारा केला तो इशारा पाहुन मी माझ्याकडील पिशवीचे कप्प्यातील अंथ्रासिन पावडर लावुन ठेवलेली 2000/- रुपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन वाघमारे सर्कल यांचे समोर धरली. त्यावेळी ती लाच रक्कम वाघमारे सर्कल यांनी उजव्या हाताने स्विकारुन त्यांचे शर्टचे डावे बाजुचे खिशात ठेवली. त्यांनतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन डावा हात पिशवीसह डोक्यावरुन दोन वेळा फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा केला: तो इशारा पाहुन श्री. शिर्के साहेब व पथक माझ्या जवळ आले. शिर्के साहेबांचे सुचनेनुसार सापळा पथकातील महिला कर्मचारी सपकाळ यांनी माझ्याकडील व्हाईस रेकर्डर काढुन घेवुन तो बंद केला व मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर शिर्के साहेब, पंच नंबर 2 व सापळा पथक असे पंच नंबर 1 यांच्या जवळ गेलात. त्यानंतर काही वेळाने शिर्के साहेबांनी सर्कल वाघमारे यांना ताब्यात घेतले. त्यानंतर तारळे येथील तलाठी कार्यालय कडवेचे दारे खिडक्या बंद करून शिर्के साहेबांनी पुढील कारवाई केली. त्यानंतर काही वेळाने मला कार्यालयात बोलावुन अंधारात माझ्या त्यांच्याकडील दिव्याने तपासण्या केल्या असता माझ्या उजव्या हाताचे बोटांचे पे-यांना व तळहातास तसेच पिशवितील कप्प्याचे आतील बाजुस व कंडांस अंथ्रासिन पावडरची निळसर चकाकी दिसुन आली. त्यानंतर मला बाहेर थांबण्यास सांगुन पुढील कारवाई केली. त्यानंतर शिर्के साहेब यांनी वाघमारे सर्कल यांना ताब्यात घेवुन तसेच मी व मपोक. सपकाळ सोबतच्या वाहनांनी सातारा न्टी करप्शन कार्यालयात दाखल झालो. त्यावेळी शिर्के साहेबांनी मला कार्यालयाचे बाहेर थांबण्यस सांगितले. त्यानंतर काहीवेळाने मला कार्यालयात बोलावुन घेवुन महिला कर्मचारी सपकाळ यांचेकरवी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर शिर्के साहेबांनी, माझे व पंच नं. 1 कुमठेकर यांचे सांगणेप्रमाणे संभाषणाचे स्क्रिप्ट मधील नामोल्लेख केला. त्यानंतर मला पुन्हा कार्यालयाचे बाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर काही वेळाने पुन्हा कार्यालयात बोलावुन घेवुन मला सर्कल वाघमारे यांना भेटण्यास गेल्यापासुनची हकिकत विचारली असता मी वरील प्रमाणे हकिकत सांगितली. सदरबाबत सविस्तर यशस्वी पडताळणी व सापळा पंचनामा न्टी करप्शन ब्युरो कार्यालय सातारा येथे टंकलीखीत करुन पुर्ण करण्यात आला आहे. तरी कृष्णात तुकाराम वाघमारे वय 48 वर्षे, सर्कल म्हावशी, ता. पाटण अतिरिक्त कार्यभार तारळे ता.पाटण जि. सातारा रा.देसाईगल्ली, शिवलिंग मंदीराजवळ पाटण जि.सातारा यांनी दिनांक 16/03/2019 रोजी माझ्याकडे माझ्या आईचे नावे असलेल्या जमिन दस्ताचे नोंदीचे तक्रारी अर्जाचा निकाल आमचे बाजुने लावुन दस्ताची नोंद कायम करणेसाठी 2000/-रुपयांची लाच मागणी करून ती लाच रक्कम तारळे येथील, कडवे तलाठी कार्यालयात दुपारी 03.10 वाजण्याचे सुमारास स्वत: स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरुध्द तक्रार आहे.माझा वरील खबरी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत केला असुन तो मला वाचुन दाखविला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे. ही खबर दिली

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे navanath thakaji **Rank** (पद): Dy. SP (Deputy

**No.**(क्र.): 100 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार ,

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): PRATAP ASHOK BHOSALE

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): api

[illegible]

[illegible]

पोलीस स्टेशन ऑफीसर
उंब्रज पोलीस स्टे...

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**